# बालानंद

कवि
मनोहर दिनकर टेकाडे

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. ८१२६



IRBK-0108126
IRBK-0108126

पूजा प्रकाशन, धंतोली, नागपूर. १.

वा. क्र. ८९२६.

# * बालानंद *

ग्रंथ क्र. ८९२६
वि: बालसाहित्य
अनुक्रम
क्रमांक कवि - २८२५
नों: दि: ४-१-५

मनोहर दिनकर टेकाडे

— प्रस्तावना —

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

— प्रकाशक —

डॉ. ल. वा. पडोळे, पूजा प्रकाशन, धन्तोली नागपूर.

८९२६
८९२६
बा. सा.

२० वें बाल पुष्प

१४ जानेवारी १९६०
किमत आठ आणे

मुद्रक :– शोभा मुद्रणालय, चितार ओळ, नागपूर शहर.

# प्रस्तावना



नागपूरचे प्रसिद्ध कवि श्री. मनोहर दिनकर टेकाडे यांनी लहान मुलांसाठी लिहिलेल्या कवितांचा संग्रह या छोटया पुस्तकांत केलेला आहे.

मुलांना आवडतील आणि समजतील असे अगदी त्यांच्या सरावांतले सोपे विषय श्री. टेकाडे यांनी या कवितांतून योजिलेले आहेत. चालीहि सोप्या आहेत व भाषाहि अगदी साधी आहे. उपदेशाचा प्रयत्न कुठेहि नाही

कविता अगदी साध्या आणि सोप्या असल्या, तरी त्यांत कल्पनेचा खेळ आणि विनोदाची गंमत मुलांना रोचक वाटेल, अशी आहे. उदाहरणार्थ 'पाण्यावरली नाव' ही चार ओळींचा कविता जरी वाचली, तरी मुलांना रिझविण्याची कला श्री टेकाडे यांना किती चांगली साधली आहे, हें कळून येईल. प्रसंगानुसार चित्रें दिलेली असल्यामुळे प्रत्येक पानावर नजर टाकतांच मुलांना कवितेचा विषय आणि आशय कळून येईल. सारांश, मुलांनी हौसेने हातांत घ्यावे, असे या पुस्तकाचे साजरे स्वरूप आहे.

श्री. टेकाडे यांचा हा 'बालानंद' बाल बालिकांना निस्संशय आनंद देईल.

धंतोली नागपूर — ग. त्र्यं. माडखोलकर

ता. १५-१२-५९

॥ श्री ॥


चि. मनोहर, श्री सद्गुरु तुकाराम महाराज (मोहपा, जि. नागपूर) यांच्या कृपाप्रसादानें तुझा हा 'बालानंद' बालांना सदैव आनंद देत राहो !

धन्तोली–नागपूर,
बुधवार, ता. २३ डिसेंबर १९५९

तुझा
**आनंदराव टेकाडे**

---

माझे परम पूज्य काका
तीर्थस्वरूप –
**आनंदराव कृष्णाजी टेकाडे,**
**नागपूर**
यांचे पवित्र चरणीं
सादर अर्पण.



IRBK-0108126
IRBK-0108126

---

## दोन शब्द

बालांचीं बाल मनें समजुनि रंजन करील जो त्यांचें ।
सद्कवि मुलां-फुलांचा बाल लिलामृत तयावरी वर्षे ॥

प्रौढासाठी वाङमय निर्माण करणें जेवढें सहज साध्य असते, तेवढेंच प्रौढांनी सरस बाल वाङमय तयार करणे कष्टसाध्य असते कारण स्वतःचें प्रौढत्व विसरून बाल जगांत रममान होण्याचें कौशल्य ज्यांच्यात असतें, तेच या कष्टसाध्य कलेंत यशस्वी होऊ शकतात. या दृष्टीने पाहतां माझे मित्र श्री. मनोहरराव टेकाडे हे बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झाल्याचे आढळून येईल. या बालानंदांतील शिशुगीतें बालांच्या जीभेवर सहज नाचतील अशींच आहेत, याची साक्ष प्रत्यक्ष बाळेंहि देऊं शकतील. या पूर्वी यांचें एक पुस्तक 'छाया' या कसोटीवर उतरलें आहे.

(मागें पहा)

या चिमुकल्या संग्रहांत संयुक्त महाराष्ट्रांतील थोर व प्रतिभा संपन्न साहित्यिक आणि नागपूरच्या तरुण भारत दैनिकाचे मातबर संपादक श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी छोटीशी चटकदार पण मार्मिक अशी प्रस्तावना देऊन अनमोल असा साज चढविला आहे. तसेच विदर्भांतील ख्यातनाम साहित्यिक कविवर्य आनंदराव टेकाडे यांनी शुभाशीर्वाद देऊन उपकृत केले आहे.

या दोन्ही थोर साहित्यिकांचा मी अत्यंत आभारी आहे.

शेवटी कवीच्या बाल कवितांचें वाचक हर्षभरें स्वागत करोत अशी सदिच्छा व्यक्त करून हे दोन शब्द येथच संपवितों.

ता. २५।१२।५९ ल. वा. पडोळे, संचालक

पूजा प्रकाशन, धन्तोली नागपूर.

## लेखकाचे दोन शब्द

मुलांनो, माझा 'छाया' कविता संग्रह १९४० मध्यें प्रसिद्ध झाला. हा दुसरा संग्रह पुस्तक रूपाने पूजा प्रकाशनाचे संपादक डॉ. ल. वा. पडोळे यांनी प्रसिद्ध केला आहे.

मुलांचें मासिकाचे संपादक श्री. बाबाराव मोडक यांनी यांतील बऱ्हंशी कविता या पूर्वीच मासिकांतून सचित्र छापल्या व आज ते चित्रांचे ठसे या पुस्तकाच्या उपयोगाकरितां दिले.

तरुण भारताचे संपादक श्री भाऊराव माडखोलकर यांनी छान प्रस्तावना लिहून दिली.

या सर्वांचा माझा घरगुती जिव्हाळ्याचा संबंध आहे म्हणून ह्या सर्व गोष्टी सहज सुलभतेने घडून आल्या.

शोभा मुद्रणालयाचे चालक श्री. अजीतकुमार बंड यांनी हें पुस्तक फारच थोड्या वेळांत उत्तम छापून दिले यामुळे वरील चौघांचाहि मी फार फार आभारी आहे

आणखी शंभर पानांची कविता लिहून ठेवली आहे. सवड मिळाल्यास ती प्रसिद्ध करता येईल.

तुम्हा सर्वांना ह्या कविता आवडतील अशी आशा आहे.

ता. २५।१२।५९. नाईक झेंडा, सर्वांचा नम्र

स. नं. ४, नागपूर शहर. मनोहर दिनकर टेकाडे

# दसऱ्याचें सोनें

धरूं एकता गाऊं गाणें

घ्या हो घ्या दसऱ्याचें सोनें

वैर विसरुनी लाजिरवाणें

प्रेमाचीं दृढ करूं बंधनें

बरवें जीवन जगणें मानें

जगांत मिरवूं हंसत मुखानें

शोभुन दिसतें नीट वागणें

गोड बोलणें राजसवाणें

आजवरी मंगल दसऱ्यानें

लिहिलीं इतिहासाचीं पानें

धरूं एकता गाऊं गाणें

घ्या हो घ्या दसऱ्याचें सोनें

भु मा.

# आज दिवाळी करूं साजरी



स्वतंत्र भारत दौलत भारी
आज दिवाळी करूं साजरी
तुटुनि तटातट बंध आसुरी
भरे जोम अंगांत तरतरी
परसत्ता जाऊन विषारी
मंगल तोरण झळकें दारीं
अतां दास्य संपलें विकारी
अपुली मिटली चिंता सारी
भयद रात्र सरली अंधारी
उषा रंगली सुखद हांसरी
स्वतंत्र भारत दौलत भारी
आज दिवाळी करूं साजरी

मु. मा.

# उष्टीं बोरें

जरा मुलांनो देउनि कान । गोष्ट सांगतों ऐका छान
शबरी नांवाची भिल्लीण । रहात होती वनीं मजेन
तिची झोपडी एक लहान । प्रिय तिला जणुं वाटे प्राण
रामा विषयीं साफ तिचें मन । नित्य करी ती त्याचें पूजन
सीतेला आणाया शोधुन । बंधु निघाले राम नि लक्ष्मण
होइल रामाचें मज दर्शन । शबरी गेली फारच हर्षुन
वनांत या येणार म्हणून । स्वच्छ झोपडी केली झाडुन
रामासाठीं बोरें तोडुन । फिरली जंगल तुरु तुरु चालुन
बोर तोडतां पाही चाखुन । गोड ठेविलीं आंबट फेकुन
झोपडींत टोपली भरून । डोळे शिणले वाट बघून
येतां राम विसरली भान । आलें आनंदास उधाण
बसावयाला दिधलें आसन । बसले त्यावर राम लक्ष्मण
समोर ती टोपली धरून । वदली घे खा गोड सुधेहुन
उष्टीं बोरें भक्ति ओळखुन । मिटक्या मारित खाउन टाकुन
धाला रघुविर थोर महान । शबरी नाचे अति आनंदुन

नागपूर नभोवाणी

# काजवा

•••०O०•••

बघुन मोकळी हवा
निघाला । रात्र तरी काजवा
उडणारा हा दिवा
कि दुसरा । फिरतां तारा नवा

※ ※ ※

करूं नको गवगवा
एकटे । फिरूं नये बा तुवां
ऐक इवलशा जिवा,
कुणि तुला । धरून नेइल बुवा

# वानरास

या झाडाहुन त्या झाडावर
मार वानरा उड्या भराभर

श्रीरामावर प्रसंग दुर्धर
आला तेव्हा झाला सादर

रघुरायाने तुझ्या बळावर
सेतू बांधुन पैल तिरावर

गेला लंघुन अफाट सागर
वधिला रावण करून संगर

सीतामाई स्वरूप सुंदर
हर्षित झाली हंसणें सुरुचिर

सजली नगरी, सजलें मंदिर
उतरविला तूं स्वर्ग धरेवर

हवा तुझा सहवास निरंतर
तूच शोभसी मित्र खरोखर

या झाडाहुन त्या झाडावर
मार वानरा उड्या भराभर

बा. स.

(१०)

# टिप्या

हा टिप्या आमुचा घरचा राखणदार
जणुं उभा शिपाई सोडित नाही दार
चोरास न देतो ठाव पळवितो दूर
अति स्वभाव याचा सरळ इमानी फार
रात्रींस घालतो गस्त घरीं चौफेर
भ्यायचा न कधि हा गुडुप जरी अंधार
किति शरीर याचें छान दिसें भरदार
हा सदाच देई मनास माझ्या धीर



# पाऊस

आला पाउस पडती धारा
नद्या वाहती भरुन किनारा

सोसाटयाचा सुटला वारा
कोटरांत पांखरांस थारा

मेघ वाजवी नभीं नगारा
वीज वसविते मनीं दरारा

डुलूं लागला हिरवा चारा
हर्ष जाहला गुरां–वासरां


शेतकऱ्यांचा संपे पेरा
मार्ग मोकळा मिळे अंकुरा

जवार, कापुस, तूर, हरबरा
सुखविल डोळे गव्हाचा तुरा

आला पाउस पडती धारा
नद्या वाहती भरुन किनारा

२८९९१
१।१।
२८२५
५।१५

# चिमणी



अग ए चिऊ

चोंच तुझी छान किती पंख आहे मऊ

अग ए चिऊ

देह तुझा सान परि करामत बहू


अग ए चिऊ

घेऊं नको मान चल आकाशांत जाऊं

अग ए चिऊ

ऐक देऊन कान बाई मौज पाहुन येऊं

# उजाडलें !



उजाडलें रे उजाडलें । धृ० ।
पूर्व दिशा उजळल्यामुळें.
हा तिमिर कुठे दडला न कळे रे उजा०
रात्र संपली भय मिटलें,
परि घूक बिचारे हळहळले ! रे उजा०
तारे सगळे मावळले,
बघ ऊन्ह अहा पिवळें पडलें ! रे उजा०
छान दिसें आकाश निळें,
हीं निघालींत शाळेस मुलें रे उजा०

बा. स.

# दुर्गुणास कर दुरून वंदन

बा बाणावा अंगीं सद्गुण
दुर्गुणास कर दुरून वंदन
घ्यावा दिसतां उचलुन चटकन
नाही त्यास कुणाचें बंधन
मधमाशी ही फिरते वनवन
मध गोळा करण्या बघ हर्षुन
फूल पांखरांचें हें जीवन
पराग सेवावया फुलांतुन
कमळाचें तें हसणें पाहुन
भृंगाचेंही चालें गुंजन
वायू नेतो सुगंध वाहुन
दुर्गंधाला लावी पळवुन
नेउन सोडी घाण जलांतुन
सरिता ठेवी निर्मळ जीवन
बा बाणावा अंगीं सद्गुण
दुर्गुणास कर दुरून वंदन

बा. स.

(१५)

# पिकला आंबा

टोपलींतला तिने घेतला पिकला आंबा हातांत
आली माझ्या समोर बाला चोखित चोखित ऐटींत
मी म्हटलं 'दे' 'अंहं' म्हणाली टपोर डोळे दाखवित
घट्ट दाबतां कोय उडाली मीच झेलली निमिशांत
आणि घातली तोंडांत
मी माझ्या तिजला बघत
फोतर तिचिया हातांत
असें कसें जाहलें तयाचा विचार होती ती करित
कळलें नाही शब्द परंतू 'गोल' उगवले ओठांत
आम्र रसाने दंत शोभले स्वच्छ पांढरे टवटवित
फुलें वाहतां देवघरांतिल देव दिसावे प्रफुल्लित


मु. मा.

# पतंग

पतंग माझा उंच उडाला नभांत वाऱ्यावर
पहा तो क्षणांत दिसतो स्थिर
की करित तपस्या बसला हा मुनिवर
वा लहानसें कुणि उभारिलें मंदिर
चौफेर मोकळें हवेशीर सुंदर
मला गमे घेण्यास विसावा स्वर्गामधले सुर
इथे तर येतिल वरचेवर
तो हलतो डुलतो होतो खाली वर
कधि घेतो गिरक्या हळू हळू गर्गर
हा दोरा त्याचा भासे जणुं रविकर
गड्या पतंगा, उतरवितां दुज का करिसी कुरकुर ※
स्मरावा हृदयीं परमेश्वर

※ हवेत होणारा तावाचा आवाज

# माझी सायकल



हो सायकल सुंदर किती
चालते पहा भरभरा
हीं चाकें बघ छोटिशीं
फिरतात कशीं गरगरा
वाजते घंटिका अशी
ये हात लाव तूं जरा
बैसून हिच्यावर असा
मी फिरून येतों घरा

मु. मा.

# पाण्यावरली नाव

पाण्यावर हाले कशी कागदाची नाव
चाले पुढे पुढे जणू गाठताहे गांव
खर्च नाही हिला लागे इवलासा ताव
थांबा हींत बसूं नका जागेचा अभाव

मु. मा.

•••○•••

# चल शाळेंत



उशीर झाला झाली घाट
बसून राहू नकोस, ऊठ !
दप्तर पाटी घे हातात
ठेव खेळणी, चल शाळेंत !

मु. मा.

(१९)

# समजावणी !

२७८८९
बा.वा.
२८७५
५।२।७५



(फटका)

अम्हा पाहुनी तुम्ही भीतिने झाडावरती कां चढता ?
जगण्यासाठी तळमळता पण मर्दाच्या मरणास भिता !
अमुचे वंशज, तुम्ही नातलग नातें कां विसरता अतां ?
*मित्रें जीवन जगूं नका रे व्यर्थ अबोला कां धरता ?*

राम आपुला असे पिता
सीता माता जणूं लता

अम्ही बांधला सेतु आमुची माहित नाही तुम्हा कथा !
अटकेवर ? छे लंकेवरती झेंडा नेला अम्ही स्वत:
मु. मा.

# जायचं ना बाजारांत ?



जेवण झालें दहा वाजले जाते शाळेला
पांच वाजतां येइन, जाऊं मग बाजाराला !
बालबोधिनी, अंक लिपीची जरूर आम्हाला
पाटीपेन्सिल छान उमटते मिळते पैशाला
दप्तर ठेवायाला पिशवी घेउन द्या मजला,
आणि विसरलें नाही माझ्या गोंडा वेणीला
आईही पण घरांत नाही गेली कामाला
लक्ष असूं द्या बाळ झोपला झोपडींत अपुला
भरभर जाते, दहा वाजले आतां शाळेला
पांच वाजतां येइन, जाऊं मग बाजाराला !

मु. मा.

# छोट्याची कामगिरी



पहा लफंगा पाणी सोडुन दवतीमधली शाई प्याला !
टिपावयाला तो मी चटकन शाइशोक तोंडांत कोंबला !
लिहायचें राहिलें अजून शाईचा मुळि थेंब न उरला
वेडा कुठला हसतो पाहुन कामाचा खोळंबा झाला !
जें झालें तें जावे विसरुन न व्हायचा झाला घोटाळा
बघूं नको तूं अशी वटारुन दे पैसा पुढि आणायाला

मु. मा.

म. ग्रं. सं. ठाणे,

# आजोबा




आजोबा, अम्हि बोलवायला
आलों, झाली तयार कॉफी
न घेतांच कां तुम्ही निघाला ?
चाल चालुनी तुरुतुरु सोपी !
राग तुम्हाला कांहो आला ?
दिसली नाही म्हणून टोपी !
लपवुन ठेवुन जपून तिजला
केली गंमत; मी आरोपी !
पिऊन कॉफी घ्यावी टोपी
गुन्हेगार मी, मज द्या माफी !

मु. मा.


# वाघ आला !




वाजत गाजत आला वाघ। बघणाऱ्यांची लागे रीघ
आपणही का पाहुं नये मग। चला उठा या जाऊं लगबग
दातासोबत लोंबे जीभ। उभेच राहूं अगदी लांब
तऱ्हेतऱ्हेचे लाउनि रंग। रंगविलें हें सारें अंग
'धुतूर धुतूर' वाजे तें शिंग। वाघ नाचण्या मधेंच दंग
मोत्या हा ऐकुन आवाज। येणें त्याला पडलें भाग
छोटू धरि वाघाचा संग। समोर नाचे त्याचें सोंग

मु. मा.

# उठा मुलांनो !



गांवाच्या बाहेर बघाया हवा कशी वाहते मोकळी ।
आलों धालों भल्या सकाळीं सुखी पांखरें उडूं लागलीं ।।
तरुवेलीवर नवी टवटवी मुक्या कळ्यांचीं फुलें हासलीं ।
प्रसन्नतेने भरून गेली आकाशाची पूर्ण पोकळी ।।
कुकूच कू रे उठा जाहली पहाट वेळा रात्र संपली ।
दिली दवंडी गांवांतुन तरि अजुन आळशी मुलें झोपलीं ।।
अभ्यासाची नाही पर्वा रीत, शिस्तही नाही कुठली ।
उठा मुलांनो भल्या पहाटें सृष्टी सारी फिरूं लागली ।।

म. मा.


# गंमत जंमत




एकीकडे माझ्या खाऊ । एका हातीं बघा काऊ
आम्ही साऱ्याजणी घेऊं । तुम्ही हात नका लावूं
मनी म्हणे म्याऊ म्याऊ । दही, दूध, तूप खाऊं
दिसे लठ्ठ मऊ मऊ । रोज हिला घालूं न्हाऊ
हातांतून गेली चिऊ । उंच उंच नको जाऊं
तुझ्या मागे कशी धावूं ? । कोठले ग पंख लावूं ?
पुरे आतां खेळ ठेवूं । चोळींतील फळें खाऊं
ताट, पाट मांडूं जेवूं । मग थोडीं गाणीं गाऊं

मु. मा.

# असंच पाहिजे




( चाल–कार्तीक पौर्णिमा )

अभ्यास कराया नको तुला तूं नित्य
करितोस टवाळी बरें काय हें कृत्य ?
खोटेंच सांगतो कधि न बोलला सत्य
पाहिला न मी तुज समान मुलगा व्रात्य
रे नकोच माझें उगिच खवळवूं पित्त
जा निघून वर्गांतून बिघडते शिस्त !

मु मा.

# सुनें घर






( चाल–अंगणांत दुडदुडा )

संध्याकाळ झाली गेले पक्षी दूरवर ।
घरट्यांत पिलें त्यांचीं भेटाया आतूर ॥
आई दर्शनास गेली गावांत मंदीर ।
यावयाला घरीं तिला दिसतो उशीर ॥

बाबा नाही गांवीं गेले खूप दूरदूर ।
मोत्या माझा कोठे गेला लागे हुरहूर ॥
शोधावया जाऊं कां मी आवारा बाहेर ।
जातों पण कोण माझें राखेल हें घर ॥
थोड्याच वेळाने आतां पडेल अंधार ।
बागुलबुवाजीची मला भीति वाटे फार ॥
कोण त्याला खायासाठीं देईल भाकर ।
अजूनही आला नाही लावावें का दार ? ॥
आई, बाबा आले सारे काळजींत फार ।
मोत्यावीण दिसें माझें सुनें सुनें घर ॥

# विमानास



नभांतली ही घार विमाना सांग तुझी कोण ? ।
तुझें नी तिचें रूप सारखें विचारतों म्हणुन ।।

मला वाटतें बघून यावें अफाट हें गगन ।
उतर जरा तूं खालीं आहे सपाट मैदान ।।

तूंच पाहसी मौज एकटा मजला टाकून ।
आपलपोटेपणा नसावा तो दे सोडून ।।

# चांदो मामा

( चाल–आनंदी आनंद )

चांदो मामा ये ये ये
उगिच असे रागवूं नये

एकले कधी खेळुं नये
एकलकोंडे राहुं नये

डोकाउन मुळि बघूं नये
पडशिल ऐंटित जाउं नये

मेघामागे लपूं नये
भितोस कारे ? भिऊं नये

# नाजुक छकुली

मी तर लहानशी पोर
फुगडी खेळिन फारतर
धावायाला सांगु नको मज । धावणं माझं तुर्तूर
मी तर लहानशी पोर
बसेन उठेन फारतर
फिरायला रे सांगु नको मज । फिरणं माझं गर्गर
मी तर लहानशी पोर
बोलिन चालिन फारतर
गायाला तूं सांगु नको मज । गाता येइ न क्षणभर
मी तर लहानशी पोर
खाइन लाडू फारतर
जेवायाला सांगु नको मज । जेवण झालं पोटभर
मी तर लहानशी पोर
चंद्राची इवली कोर
नको त्रासवूं हिला मुळीही । ही छकुली नाजुक फार

# लाकडाचा नंदी

( चाल–ओवीची )

गाडीचा बईल । धावाया लागला
नंदी लाकडाचा । चाकानं चालला

गाडीचा बईल । गोठ्यांत बांधला
नंदी लाकडाचा । घरांत मोकळा

आला पोळा आला । बईल रंगला
नंदी लाकडाचा । रूपानं शोभला

गाडीचा बईल । जेवण जेवला
नंदी लाकडाचा । वासानं धाहला

# वंदे मातरम्







( चाल–मुक्या मनाने )

भारत माता सगळे आपण वन्दन करुं या तिला
तिच्या रक्षणासाठी मिळवूं अफाट अंगीं बळा
सकलां 'बालानंद' भेटला खेळगडी आपुला
सन्मित्रांच्या संघटनेचा मुहूर्त अजि साधला
गणरायाने बुद्धि–संपदा दिधली आम्हां मुलां
प्रसन्न झाली देवि शारदा ज्ञान–वृक्ष बहरला
सर्वांना हा अभ्यासाचा गोड नाद लागला
असाच राहो मिळत निरंतर उपदेशहि मोकळा
भारत माता सगळे आपण वन्दन करुं या तिला
तिच्या रक्षणासाठी मिळवूं अफाट अंगीं बळा

---

गुरुवार, मार्गशीर्ष शुद्ध ११, शके १८८१, ता.

समाप्त

IRBK-0108126
IRBK-0108126